सं. फौ.ख.क्र.२५ /२०२३
सरकार वि. उध्दव
नि.क्र.

<u>**सरकारतर्फे साक्षीदार क्र.०१ शपथेवरः–**</u>

माझे नाव – गोविंद बाबुराव शिंदे
वय २९ वर्षे, कामधंदा – व्यापार,
रा. लामजना, ता. औसा, जि. लातूर.

<u>**सरतपास विद्वान सरकारी अभियोक्ता श्री. एस.एस. वाघमारे मार्फत शपथेवर सुरु :–**</u>

१. दि.०९.०१.२०२३ रोजी पोलीसांनी मला छापा टाकण्यासाठी बोलाविले नव्हते. पोलिसांनी माझे समक्ष कोणतीही वस्तू जप्त केली नाही. आता मला दि. ०९.०१.२०२३ चा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यातील मजकुर मला माहित नाही. सदर पंचनाम्यावर माझी सही आहे. सदर सहीस **नि.क्र. पी–१.पी.डब्ल्यु.१** देण्यात येते.

<u>**(साक्षीदार हा अभियोग पक्षाला समर्थन करत नसल्याने विद्वान सरकारी अभियोक्त्यांनी साक्षीदाराला उलटतपासणीत विचारता येणारे प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. परवानगी देण्यात येत आहे.)**</u>

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.०९.०१.२०२३ रोजी सायंकाळी ७.३० ते ८ च्या दरम्यान पोलिसांनी सना वडापाव सेंटर लामजना याठिकाणी छापा टाकण्यासाठी बोलावले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी माझे सोबत समदानी शेख होते. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या समक्ष पोलिसांनी आरोपी उध्दव सगर याच्या ताब्यातून एक कार्बनचा वापर करून लिहीलेली चिटठी ज्यामध्ये एम एन९, ४०५ x ९.५ आणि शेवटच्या कॉलममध्ये 99-10@10 अशा मजकुराची चिटठी, निळा बॉल पेन आणि रक्कम रूपये १७३०/– व ओपो कंपनीचा मोबाईल असे जप्त केले. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी जप्ती पंचनामा करून तो जुगाराचे साहित्य लिफाफयात सिलबंद केले. हे म्हणणे खरे नाही की, जप्ती पंचनामा वाचुन दाखविला व त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी माझे गावातील राहणारे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे माझे गावातील

असल्याने त्यांच्याशी माझे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी कोर्टात स्वतःहुन आरोपींसोबत आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना मदत करण्यासाठी जप्ती पंचनामा समक्ष झाला नाही हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपी तर्फे विदवान विधीज्ञ श्री. आय. एच. पटेल मार्फत</u>**.
३.	यांनी सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्याचे नाकारले.

**<u>फेरतपास नाही.</u>**

सा.वा.दा.अ.ब.अ.कबूल केले.

Digitally signed by NALAWADE SHUBHANGI HEMANT
Date: 2026.06.09 16:38:15 +0530

(एस. एच. नलावडे)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
औसा
दि. ०९.०६.२०२६

माझे समक्ष,

Digitally signed by NALAWADE SHUBHANGI HEMANT
Date: 2026.06.09 16:38:20 +0530

(एस. एच. नलावडे)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
औसा
दि. ०९.०६.२०२६

नियमित प्र.क्र. १८७/२०२२
सरकार वि. राजकुमार व इतर
नि.क्र.

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.०२ शपथेवरः-</u>**

माझे नाव - विकास शिवाजी कांबळे,
वय ३१ वर्षे, कामधंदा - चालक,
रा. हिप्परगा, ता. औसा, जि. लातूर.

**<u>सरतपास विद्वान सरकारी अभियोक्ता श्री. एस. एस. वाघमारे मार्फत शपथेवर सुरु :-</u>**

१. दि. १०.०३.२०२२ रोजी पोलीसांनी मला पोलीसांनी पंचनामा करण्यासाठी बेलकुंड येथील सचिन साळुंके यांच्या शेतामध्ये बोलाविले होते. त्यावेळी बालाजी अंगद जगताप, सचिन साळुंके यांचे भाउ, आई, वडिल हजर होते. पोलीसांनी आमच्या समक्ष घटनास्थळाचा वस्तुस्थिती प्रमाणे नकाशा तयार करून पंचनामा केला. घटनास्थळाच्या पुर्वेस सचिन साळुंके यांचे शेत, सचिन साळुंकेच्या विरूद्ध दिशेला पठाण यांचे शेत आहे, दक्षिणेस राम साळुंके यांचे शेत आहे. सदरचा पंचनामा मला दाखविल्यास मी ओळखु शकतो. आता मला सदरचा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. पी-१.पी.डब्ल्यु-२** देण्यात येते.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे विदवान विधीज्ञ श्री. आर.एम.शेख मार्फत सुरू -</u>**

२. माझे शिक्षण इयत्ता १२ वी पर्यंत झाले आहे. सचिन माझा मित्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, सचिनला गरज पडल्यास ट्रॅक्टर नांगरणीकरीता तो मला बोलवितो. हे म्हणणे खरे नाही की, सचिनच्या बोलवण्यावरून मी पंचनाम्याकरीता गेलो होतो. घटनास्थळाचा पंचनामा हा शेताचा आहे. घटनास्थळाचा सर्वे क्रमांक मला सांगता येणार नाही. घटनास्थळावरील शेतजमीन सचिन वहिवाटत असल्यामुळे ती त्याची आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ रोड लगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, बेलकुंड रस्त्यावर वाहनांची वर्दळ असते.

३. घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी सकाळी ९.०० च्या सुमारास मी गेलो होतो. सदरचा पंचनामा एक तास चालला होता. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी खुर्च्या वगैरे नाही. हे म्हणणे खरे नाही की, घ ाटनास्थळाचा पंचनामा पोलीस स्टेशनमध्ये तयार करण्यात आला. बालाजी हा माझा मित्र आहे. पंचनामा करतेवेळी लोखंडी रॉड आणि काठ्या सापडल्या होत्या. पंचनाम्यावर मी दोन ठिकाणी सह्या केल्या. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस स्टेशनमध्ये बसुन पंचनाम्यावर सह्या केल्या. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्याच्या दिवशी घटनास्थळी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळाचा पंचनामा पुर्वीच तयार करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, सचिन माझा मित्र असल्यामुळे मी खोट्या पंचनाम्यावर सह्या केल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील मजकुर खोटा असून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**
**फेरतपास नाही.**

सा.वा.दा.अ.ब.अ.कबूल केले. माझे समक्ष,

(एस. एच. नलावडे)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
औसा
दि. १७.०७.२०२५

(एस. एच. नलावडे)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
औसा
दि. १७.०७.२०२५